ई-मेल : दिनांक:-


महाराष्ट्र शासन

**सहकार आयुक्त व निबंधक,**

**सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय.**

इ-मेल आयडी — commpat2018@gmail.com दुरध्वनी क्रमांक-०२०- २६१२२८४६-४७


जा.क्र. पतसंस्था/स.आ-५/ पगारदार /कर्म.पत/ कर्जमर्यादा/२०२० /१ दिनांक :-३१ /१२/२०२०

## -: परिपत्रक :-

**विषय :- पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थांना दयावयाच्या कर्जमर्यादा वाढीबाबत.**

१. राज्यामध्ये एकूण ७२३२ नोंदणीकृत पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्था कार्यरत असून या संस्था प्रामुख्याने सभासदांकडून भाग भांडवल व ठेवी स्विकारून सभासदांच्या उन्नतीसाठी कर्ज रूपाने पतपुरवठा करणे हे कार्य करीत आहेत.

२. राज्यातील पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थामधील दयावयाची कर्जमर्यादा ही दिनांक ०७/११/२०१९ रोजीचे परिपत्रकानुसार सभासदांच्या वेतनाच्या ३० पटीपेक्षा किंवा विहीत केलेल्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून रूपये ४.०० लाख ते ५०.०० लाख अशी मंजूर करण्यात आली होती. त्याचप्रमाणे सभासदास तातडीचे कर्ज रु. ५०,०००/- ते ७५,०००/- व्याजासह १२ समान मासिक हप्त्या मध्ये परतफेड करणेस मंजूरी देण्यात आलेली होती.

३. सभासदांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी दिनांक ०७/११/२०१९ च्या परिपत्रकान्वये निश्चित करण्यात आलेली कर्जमर्यादा ही सभासदांचा एकूण सेवा कालावधी व एकूण ढोबळ वेतन विचारात घेऊन निर्धारीत करणेत आली होती तथापि कमी वेतनमान असणाऱ्या सर्व सभासदांना सदर कर्जमर्यादेचा प्रत्यक्ष पुरेसा फायदा होत नसल्याचे विविध संस्थांनी या कार्यालयाचे लक्षात आणून देऊन ही मर्यादा वाढविण्याची लेखी विनंती केलेली आहे.

४. त्यानुसार, सातव्या वेतन आयोगानुसार पगारदार कर्मचारी वर्गाचे वाढलेले पगार, कर्ज परतफेडीची वाढलेली क्षमता इत्यादी बाबी लक्षात घेता या संस्थांच्या सभासदांना देण्यात येणाऱ्या कर्ज मर्यादेमध्ये वाढ करण्यासाठी या कार्यालयाचे दिनांक ०७/११/२०१९ चे परिपत्रक रद्द करण्यात येत असून त्याऐवजी या परिपत्रकाद्वारे खालीलप्रमाणे **सुधारित कमाल कर्ज मर्यादा** खालील नमूद अटीस अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

**तक्ता क्र. ( १)**

| अ.क्र (१) | सभासद वेतन मर्यादा (रुपये) (२) | सुधारित कमाल कर्ज मर्यादा (३) |
|---|---|---|
| १ | रु. १५,०००/- मासिक वेतनासाठी | रु ५ लाख |
| २ | रु.१५,००१/- ते रु.२५,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी | रु.८ लाख |
| ३ | रु.२५,००१/- ते रु.३५,०००/- पर्यंत मासिक | रु.१५ लाख |

| | | |
|---|---|---|
| | वेतनासाठी | |
| ४ | रु.३५,००१/- ते रु.४५,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी | रु.२० लाख |
| ५ | रु.४५,००१/- ते रु.५५,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी | रु.२५ लाख |
| ६ | रु.५५,००१/- ते रु.७०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी | रु.३० लाख |
| ७ | रु.७०,००१/- ते रु.९०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी | रु.३५ लाख |
| ८ | रु.९०,००१/- ते रु.१,००,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी | रु.३८ लाख |
| ९ | रु.१,००,००१/- ते रु.१,२०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी | रु.४१ लाख |
| १० | रु.१,२०,००१/- ते रु.१,४०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी | रु.४४ लाख |
| ११ | रु.१,४०,००१/- ते रु.१,६०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी | रु.४६ लाख |
| १२ | रु.१,६०,००१/- ते रु.१,८०,०००/- पर्यंत मासिक वेतनासाठी | रु.४८ लाख |
| १३ | रु.१,८०,००१/- चे पुढील मासिक वेतनासाठी | रु.५० लाख |

५. त्याचप्रमाणे पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थांच्या सभासदांना दयावयाच्या **तातडीची कर्जमर्यादा** पुढीलप्रमाणे राहील.

**तक्ता ( २)**

| अ.क्र. (१) | सभासद वेतनमर्यादा रूपये (२) | सुधारित कर्ज मर्यादा (३) |
|---|---|---|
| १ | रु.५०,०००/ पर्यंत मर्यादा रूपये | रु. ३० हजार |
| २ | रु. ५०,०००/- ते १ लाखापर्यंत मासिक वेतनासाठी | रु.६० हजार |
| ३ | रु.१ लाखा वरील एकूण मासिक वेतनासाठी | रु.८० हजार |

तातडीचे कर्ज व्याजासह १२ समान हप्त्यामध्ये वसुल करण्यात यावे.

६. पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळ व व्यवस्थापक यांनी सभासदाला वर नमूद कर्जमर्यादेनुसार वाटप करताना खालील बाबी विचारात घेवुन कर्ज वाटप करावे.

I. सभासदाला दयावयाचे कर्ज हे त्याच्या मासिक वेतनाच्या ३० पटी पेक्षा जास्त किंवा वर नमूद तक्ता क्र. १ व तक्ता क्र.(२) मधील कोष्टक क्र. (३) मध्ये नमूद सुधारीत कमाल मर्यादेपेक्षा जास्त नसावे.

II. सभासदांना दयावयाच्या कर्जामध्ये सभासदाचे एकूण मासिक ढोबळ वेतनमान,कर्ज परतफेडीची क्षमता आणि वेतन प्रदान कायदा १९३६ मधील कलम ७ (३) (एक) अन्वये नमूद केले प्रमाणे सर्व

प्रकारच्या वैधानिक , आयकर व अन्य वजावटी आणि पूर्वी मंजूर करण्यात आलेल्या कर्जाच्या व आता मंजूर करण्यात येणाऱ्या कर्जाच्या समान मासिक व्याज हप्त्यासह एकूण कपातीचा रक्कम ही एकूण ढोबळ मासिक वेतनाच्या ७५% पेक्षा अधिक असता कामा नये.

III. कर्जाचे कमाल मासिक हप्ते (मुद्दल व व्याजासह) २४० इतके राहतील.संस्थेने कर्ज परतफेडीच्या हप्त्यांची संख्या ठरविताना सभासदांचा उर्वरीत सेवा कालावधी विचारात घ्यावा.

IV. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ४९ अन्वये सभासदाचे वेतनातून द्यावयाच्या कपातीबाबतचे संबंधीत आहरण व संवितरण अधिकाऱ्याचे किंवा आस्थापनेचे (Employer) प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

V. संस्थेने कर्जवाटप करतांना संस्थेकडील उपलब्ध निधी खर्च (cost of fund) चा विचार करूनच कर्ज वाटप करावे.

VI. संस्था स्वनिधीतून कर्ज वाटप करीत असल्यास संस्थेची सभासद संख्या व संस्थेचा उपलब्ध निधी विचारात घेऊनच जास्तीत जास्त सभासदांना कर्जवाटप होईल असे पाहावे.

संस्थेस वैधानिक अधिकार प्राप्त निबंधकाने वर नमूद केलेप्रमाणे कमाल कर्जमर्यादावाढी बाबत संस्थेची उपविधी दुरूस्ती करताना संस्था खालील नमूद अटींची पूर्तता करते किंवा कसे याबाबत तपासूनच गुणवत्तेवर उपविधी दुरूस्ती करणेबाबत निर्णय घ्यावा.

अ. संस्थेचे मागील लगतच्या संपलेल्या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण झालेले असावे. तसेच मागील लगतच्या सलग तीन आर्थिक वर्षात संस्थेला लेखापरीक्षण वर्ग " अ " असावा .

ब. संस्थेचे मागील लगतच्या आर्थिक वर्षात निव्वळ एनपीए चे प्रमाण ५% पेक्षा कमी असावे.

क. संस्थेने सहकार कायदा ,नियम व सहकार विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील तरतूदीप्रमाणे निधीची गुंतवणूक केली असली पाहीजे.

**(अनिल कवडे)**
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य पुणे.**

प्रति,

१. विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था, (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,(सर्व)
३. अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या,मुंबई
४. अध्यक्ष,मुंबई / मुंबई कोकण विभागीय पगारदार पतसंस्थांचा सहकारी संघ मर्या,मुंबई
५. अध्यक्ष, जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन (सर्व)